ठाणे, मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४१ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026


सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे


अग्रलेख

**मणिपूराबाबत केंद्र सरकार उदासीन**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जवळपास १६ महिने एकदाही मणिपुरास हिंसाचार घडल्यानंतर भेट दिलेली नाही, हे आश्चर्यकारक आहे.

.......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा... ePaper PDF www.maharashtrasamrat.com


**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मुलाला राजकारणातच पाठवावे लागणार असे वाटते. गधडा बारावीत नापास झाला नं? त्याला अभ्यासापेक्षा बाहेरच्या गोष्टींत जास्त रस आहे

# गणरायाच्या विसर्जनासाठी पोलीस आणि पालिका प्रशासनाची चोख व्यवस्था

**ठाणे – गणपती बाप्पा मोरया मंगलमुर्ती मोरया, पुढच्यावर्षी लवकर या असे म्हणत मंगळवारी दहा दिवसांच्या बाप्पांना निरोप दिला जाणार आहे. या दिवशी शहरातील साडे नऊ हजारांहून अधिक गणेशमुर्ती विसर्जित केल्या जाणार आहे. विसर्जनस्थळी पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त असून पालिकेच्या कर्मचारीही तैनात करण्यात आले आहेत. तसेच, विविध ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. मंगळवारी विसर्जनानिमित्त शहरातील वाहतूकीत देखील बदल केला जाणार आहे.**

दीड, पाच, सहा, आणि सात दिवसांच्या बाप्पाला निरोप दिल्यानंतर मंगळवारी म्हणजेच अनंत चतुर्दशीच्यादिवशी दहा दिवसांच्या बाप्पांना वाजत गाजत, गुलालाची उधळण करत, ढोल ताशा गजरात निरोप दिला जाणार आहे. सहा वाजल्यानंतर बाप्पांना निरोप देण्यासाठी विसर्जन मिरवणूका काढल्या जातील. परिमंडळ१ अंतर्गत ३७१८ तर परिमंडळ ५ अंतर्गत ५५९७ अशा ९३१५ खाजगी गणेशमुर्तीचे तर परिमंडळ १ अंतर्गत १०१ तर परिमंडळ ५ अंतर्गत १५२ अशा २५३ सार्वजनिक गणेशमुर्तींचे विसर्जन केले जाणार आहे.

### फिरती विसर्जन व्यवस्था

फिरती विसर्जन व्यवस्था नौपाडा-कोपरी, माजिवडा-मानपाडा, वागळे आणि वतर्कनगर या चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपलब्ध असेल. सकाळी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध राहील.





### ०९ ठिकाणी विसर्जन घाट

कोपरी, पारसिक रेती बंदर, रेतीबंदर -१, रेतीबंदर-२-राणानगर, फास्ट ट्रॅक ब्रिज, बाबाजी पाटील वाडी, शंकर मंदिर घाट, कोलशेत, बाळकूम अशा ०९ ठिकाणी विसर्जन घाटांची व्यवस्था आहे.

### १० मूर्ती स्वीकृती केंद्रे

जेल तलाव, मढवी हाऊस-राममारुती रोड, महागिरी कोळीवाडा, टेंभी नाका, रिजन्सी हाईट्स-आझादनगर, लोढा लक्झेरिया, कामगार हॉस्पिटल, किसन नगर बस स्टॉप, मॉडेला चेक नाका, देवदया नगर-शिवाई नगर या १० ठिकाणी मूर्ती स्वीकृती केंद्रे आहेत.

### १५ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था

आंबेघोसाळे, मासुंदा दत्त घाट, खारीगाव, घोलाईनगर, दातिवली तलाव, खिडकाळी तलाव, न्यू शिवाजी नगर कळवा तलाव, निळकंठ वूड्स- टिकूजीनी वाडी, रेवाळे, बोरिवडे, ब्रम्हांड ऋतू पार्क, हिरानंदानी रायलादेवी-१, रायलादेवी-२, उपवन तलाव परिसर-वर्तकनगर, देवदयानगर अशा १५ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

### टाकी व्यवस्था ४९ ठिकाणी

यावर्षी ४९ ठिकाणी टाक्यांची सुविधा करण्यात आली आहे.

## दहा दिवसाच्या गणपती विसर्जनासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त...

ठाणे - ठाणे जिल्ह्यात दिड दिवसाचे गणपती, पाच दिवसाच्या गणेशाचे विसर्जन मोठ्या उत्साहात आणि शांततेत पार पडले. ठाणे पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवलेला होता. आता दहा दिवसाच्या गणपती बाप्पाच्या विसर्जनासाठी ठाणे पोलिसांनी पुन्हा चोख बंदोबस्ताचे नियोजन केलेले आहे.

गणपती बाप्पा मोरया मंगलमुर्ती मोरया, पुढच्यावर्षी लवकर या असे म्हणत मंगळवारी दहा दिवसांच्या बाप्पांना निरोप दिला जाणार आहे. या दिवशी शहरातील साडे नऊ हजारांहून अधिक गणेशमुर्ती विसर्जित केल्या जाणार आहे. विसर्जनस्थळी पोलीसांचा कडेकोट

### १५ हजार मनुष्यबळाचा ताफा राहणार तैनात

बंदोबस्त असून पालिकेच्या कर्मचारीही तैनात करण्यात आले आहेत. तसेच, विविध ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. ठाणे शहर आयुक्तालयात विसर्जन काळात सात पोलीस उपायुक्त, १६ सहाय्यक पोलीस आयुक्त, ८४ पोलीस निरीक्षक, ४०० सहाय्यक/उपपोलीस निरीक्षक, ४ हजार पोलीस अंमलदार, चार एसआरपीएफ कंपन्या, आरएएफ कंपनी असा पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे.

## ४८ तास दारूबंदी! राज्य सरकारने घेतला मोठा निर्णय

मुंबई - कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य सरकारने ४८ तासांसाठी दारूविक्रीवर बंदी घातली आहे. एका व्हायरल ऑडिओला विरोध झाल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. खरंतर, कर्नाटकात मद्यविक्रीवर ४८ तासांची बंदी घालण्यात आली आहे. दक्षिण कन्नडचे (डीके) उपायुक्त मुल्लाई मुहिलन यांनी आज सोमवारी (१६ सप्टेंबर) ही माहिती दिली. दक्षिण कन्नड जिल्ह्यातील बंटवाल नगरपरिषदेच्या हद्दीत सर्व प्रकारच्या मद्यविक्रीवर ४८ तासांची बंदी घालण्यात आली आहे. एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना मुल्लाई मुहिलन म्हणाले की, हिंदू संघटनांनी परिसरात तणाव पसरवणाऱ्या एका कथित **(पान २ वर)**

### गणपती विसर्जनामुळे घेतलेला निर्णय

SHO आणि अतिरिक्त निरीक्षकांसह स्थानिक कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांना या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आणि त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गणपती विसर्जन दरम्यान सुव्यवस्था राखण्यासाठी आणि शांततापूर्ण वातावरण सुनिश्चित करण्यासाठी हे पाऊल उचलेल आहे.

### हैदराबादमध्येही दारूबंदी

हैदराबाद शहर पोलिसांनी गणपती विसर्जनाच्या शेवटच्या दिवशी सामाजिक सुरक्षेसाठी शहरातील मद्यविक्रीवर तात्पुरती बंदी घातली आहे. पोलिस आयुक्त सी.व्ही. आनंद यांच्या आदेशानुसार ही बंदी १७ सप्टेंबर रोजी सकाळी ६ ते १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. हैदराबाद आणि सिकंदराबाद या दोन्ही ठिकाणी दारूची दुकाने, ताडीची दुकाने आणि बारवर ही बंदी लागू असेल.

## अनंत चतुर्थीच्या गणेश विसर्जनासाठी ठाण्यात वाहतुकीत बदल

(सविस्तर वृत्त पान २)



इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद पैगंबर जयंती म्हणजेच ईद-ए-मिलाद यानिमित्ताने मोहम्मद पैगंबर यांनी दिलेला मानवतेचा आणि शांततेचा संदेश सर्वत्र पोहोचविण्यासाठी भर पावसात मुंब्रा येथे हातात संदेश देणारे फलक घेऊन मानवी साखळी करण्यात आली. (छाया - मनोज सिंह)

## विधानसभेच्या निवडणुकीआधी महामंडळांचं वाटप, ३ नेत्यांना मंत्रीपदाचा दर्जा

मुंबई - महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. राज्यात विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे. निवडणूक आयोगाकडून कधीही निवडणुकीची घोषणा केली जाऊ शकते. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतंच निवडणुका कधी होणार? याबाबत भाष्य केल्याची चर्चा आहे. येत्या नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभेची निवडणूक होणे अपेक्षित असल्याचं मुख्यमंत्री म्हणाल्याची माहिती आहे. याचाच अर्थ निवडणुकीला केवळ दोन महिने शिल्लक आहेत. असं असताना आता राज्य सरकारने शिवसेनेच्या मंत्रिपदाची वाट पाहणाऱ्या बड्या नेत्यांना मोठी जबाबदारी दिली आहे. राज्य सरकारकडून विधानसभा निवडणुकीच्या आधी महामंडळांचं वाटप केलं आहे. यामध्ये आतापर्यंत केवळ तीन नेत्यांची नावे समोर आले आहेत. हे तीनही नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आहेत.

### हेमंत पाटील यांनी मानले सरकारचे आभार

हेमंत पाटील यांनी ही मोठी जबाबदारी मिळाल्यानंतर प्रतिक्रिया दिली आहे. राज्य सरकारच आभार मानतो कि मला राज्यमंत्री पदाचा दर्जा दिला. मी गेल्या अनेक वर्षांपासून हळद पिकावर काम करत आहे. याची दखल घेऊन मला हे पद देण्यात आलं. माझं राजकीय पुनर्वसन व्हायचं बाकी आहे. विधानसभेसाठी शिंदे साहेब जो निर्णय घेतील तो मान्य आहे, अशी प्रतिक्रिया हेमंत पाटील यांनी दिली आहे.

वाटप झालेल्या महामंडळात अद्याप भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील कुणाचंही नाव समोर आलेलं नाही. **(पान २ वर)**

## थोडक्यात घडामोडी

### ठाण्याच्या हायप्रोफाईल सोसायटीत मुख्य सुरक्षारक्षकांची क्रूर हत्या

ठाणे - ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या हायप्रोफाईल सोसायटी असलेल्या लोढा अमारा गृहसंकुलाच्या ३५ वर्षीय मुख्य सुरक्षा रक्षकाची निघृण हत्या इमारतीच्या टेरिसवर झाल्याची घटना रविवारी रात्री घडली. रात्रभर मृतदेह टेरेसवर पडून होता. सोमवारी सकाळी घटना उघडकीस आली. सोमनाथ सादगीर याच्या धडापासून डोके वेगळे करण्यात आलेले होते. या प्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केलेला केलेला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोढा अमारा हायप्रोफाईल गृहसंकुलात काही भाग हा वाणिज्य विभागासाठी आणि निवासी सदनिका वापरासाठी आहेत. या गृहसंकुलाच्या सुरक्षेच्या ताफ्यात मृतक सोमनाथ सादगीर (३५) वर्षीय मुख्य सुरक्षा रक्षक होता. रविवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास सुरक्षा रक्षक असलेल्या सहकाऱ्याने सोमनाथ सादगीर याला टेरिस वर नेऊन त्याची निघृण हत्या केल्याचा संशय पोलिसांना आहे. तर धडापासून डोके वेगळे करून मृतदेहा शेजारीच ठेवण्यात आल्याची आणि पुढील तपास सुरु असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अमरसिंग जाधव यांनी दिली. हत्या मागचे नेमके कारण अद्यापही गुलदस्त्यात आहे. तर हत्येत आणखी किती लोकांचा सहभाग आहे. याबाबतही निश्चितता नाही. दरम्यान सूत्रांच्या माहितीनुसार संशयित इसम हा रविवारी सुट्टीच्या दिवशी ही लोढा अमारा गृहसंकुलात आल्याची चर्चा सुरु आहे. संशयित याने गृहसंकुलाच्या एका कामसुरू असलेल्या गाळ्यात आला होता. त्या अज्ञातांवर पोलिसांना संशय आहे.

## कोपर रेल्वे स्थानकाजवळील बेकायदा गाळ्यांना नोटिसा

**कोपर पूर्व रेल्वे स्थानकाजवळील जिन्याचा मार्ग बंद करून उभारण्यात आलेल्या तीन बेकायदा गाळ्यांना ग प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांनी तातडीने नोटिसा बजावल्या आहेत. या गाळे मालकांना त्यांच्या जमीन मालकी, बांधकाम परवानगीची कागदपत्रे सादर करण्यात सांगण्यात आली आहेत. ही कागदपत्रे येत्या सात दिवसाच्या कालावधीत गाळे मालकांनी सादर केली नाहीतर तिन्ही गाळे पालिकेकडून भुईसपाट केले जाणार आहेत.**

कोपर पूर्व रेल्वे स्थानकाजवळ उभारण्यात आलेले गाळे जुने असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे या गाळे मालकांना जमीन मालकी, बांधकामाची परवानगी, कर पावती अशी सर्व कागदपत्रे सादर करण्याची नोटीस दिली आहे. ही कागदपत्रे गाळे मालकांनी सादर करण्यास असमर्थतता दर्शवली तर गाळे आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे तातडीने जमीनदोस्त केले जातील.

**– संजयकुमार कुमावत , साहाय्यक आयुक्त, ग प्रभाग, डोंबिवली.**

### रेल्वे मार्गातील जिना बंद करून गाळ्यांची उभारणी

**डोंबिवली** –कोपर पूर्व रेल्वे स्थानक भागात (आयरे परिसर) भूमाफियांनी गणपती सुट्टीच्या कालावधीत बेकायदा गाळे उभारल्या आहेत, अशा तक्रारी पालिकेच्या ग प्रभागाकडे आल्या होत्या. गणपतीची पालिकेला सुट्टी असल्याने त्याचा गैरफायदा भूमाफियांनी घेतला असल्याची चर्चा होती. या गाळ्यांना सुशोभित करून तेथे आर. के. एन्टरप्रायझेस हे घर, गाळ्यांची विक्री करणारे कार्यालय माफियांनी सुरू केले आहे. रेल्वे जिन्याच्या मार्गात, प्रवाशांच्या जाण्याच्या मार्गात बेकायदा गाळे उभारण्यात आल्याने या भागातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी या बेकायदा बांधकामाची गंभीर दखल घेतली. याप्रकरणी परिमंडळ उपायुक्त व्दासे यांना या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालण्याचे आदेश दिले. ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून बेकायदा गाळे उभारलेल्या जागेची पाहणी केली. स्थानिकांनी हे गाळे जुने असल्याचे आणि कार्यालय सजावट आता केली असल्याचे सांगितले. या गाळ्यांचा कोणीही जमीन मालक, चालक घटनास्थळी उपस्थित नव्हता. त्यांची नावे, पत्ते देण्यास स्थानिक रहिवासी असमर्थतता दर्शवत होते.

अखेर साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी तिन्ही गाळे मालकांच्या गाळ्यांवर नोटिसा लावून येत्या सात दिवसात गाळ्यांची जमीन मालकी, बांधकामांची कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले. गाळे मालकांनी या कालावधीत पालिकेला संपर्क केला नाहीतर त्यांचे गाळे भुईसपाट करण्यात येणार आहेत. **(पान २ वर)**

**गणेश उत्सव**



मा. आमदार निरंजनजी डावखरे यांनी दै. महाराष्ट्र सम्राटचे संपादक श्री. चंद्रकांत भोईटे यांच्या निवासस्थानातील गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी उपस्थित कार्यकारी संपादक गणेश भोईटे.



उपाध्यक्ष भाजपा ठाणे शहर श्री. जयेंद्र चिंतामण कोळी व माजी नगरसेविका सौ. नम्रता जयेंद्र कोळी यांनी दै. महाराष्ट्र सम्राटचे संपादक श्री. चंद्रकांत भोईटे यांच्या निवासस्थानातील श्रींचे दर्शन घेतले. यावेळी उपस्थित कार्यकारी संपादक गणेश भोईटे व सह संपादिका सौ. मेधा गणेश भोईटे.



ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी दै. महाराष्ट्र सम्राटचे संपादक श्री. चंद्रकांत भोईटे यांच्या निवासस्थानातील श्रींचे दर्शन घेतले. यावेळी उपस्थित कार्यकारी संपादक गणेश भोईटे.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## मणिपूराबाबत केंद्र सरकार उदासीन

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जवळपास १६ महिने एकदाही मणिपुरास हिंसाचार घडल्यानंतर भेट दिलेली नाही, हे आश्चर्यकारक आहे. मणिपुरातील परिस्थिती सुरळीत व्हावी यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी तीन महिन्यांपूर्वी केले होते. या आवाहनाला भाजपाने व पंतप्रधानांनी केराची टोपली दाखवले असेच दिसते. मणिपूर येथील काही हिंसाचार पीडित नागरिक सरकारी छावणीत राहत आहेत. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर भागवत यांनी केंद्र सरकारला मणिपुरातील परिस्थिती किती गंभीर आहे याची जाणीव करून दिली. आणि तेथील परिस्थिती पूर्ववत करण्याचे आवाहन केले होते. परंतु केंद्र सरकार मणीपुराबाबत गेंड्याची कातडी पांघरून बसल्याचे दिसत आहे. मणिपूर येथील वांशिक हिंसाचार घडला त्यावेळेस अनेक पत्रकार, अभ्यासक, विरोधी पक्षाचे नेते इत्यादींनी मणिपुरातील परिस्थितीकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या सर्वांकडे सरकारने दुर्लक्ष केले. खुद्द राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक भागवत यांनी केंद्र सरकारला मणिपूरबाबत जाणीव करून देत घराचा आहेर दिला होता. केंद्र सरकारने भागवत यांच्या आवाहणाकडे दुर्लक्ष केल्यानंतर आता माणिपूरतील वातावरण चिघळू लागले आहे. माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर हल्ला , ड्रोनद्वारे हल्ले वाढले आहेत. मणिपूर येथील अस्थैर्य केव्हा संपणार, याची चिंता केंद्र सरकारला दिसत नाही. एवढे सर्व मणीपुरात सुरू असताना केंद्रीय अमित शाह हे काँग्रेसच्या सुशीलकुमार शिंदेंना सल्ला देतात की, काश्मीरमधील कोणत्याही चौकात बिनधास्तपणे जाऊ शकता. मणीपुरात काहीच घडलेले नाही, असे दाखवण्याची काळजी केंद्र सरकार का घेत आहे ते समजत नाही. मणिपूर राज्याचे निष्क्रिय मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह हे त्या राज्यातील लष्करासह सर्वच सुरक्षा यंत्रणा राज्याच्या अखत्यारीत हवी अशी मागणी करतात आणि तरीही केंद्र सरकार त्यावर काहीच वाच्यता करत नसेल तर मुर्दाडांच्या हाती सत्ता का आहे असा प्रश्न पडावा. सदर राज्यात भाजपाची सत्ता असताना केंद्र सरकार काहीच पावले उचलत नसेल तर दोष नक्की कोणाचा आहे ? मणीपुरामध्ये दुसऱ्या पक्षाचे सरकार असते तर केंद्र सरकार गप्प बसले नसते. तिथे लागलीच राष्ट्रपती राजवल लावून आपल्या पक्षाचे सरकार सत्तेवर येण्याची व्यवस्था केली असती. केंद्र सरकार पश्चिम बंगालमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी आटापिटा करत आहे, तेच प्रयत्न मणीपुरात का होत नाही, असा प्रश्न निर्माण होतो. मणीपुरात नागरिकांना मोकळेपणाने वावरण्याचे स्वातंत्र्य अजूनही नाही. तेथील हिंसाचाराच्या पहिल्या लाटेत अडीचशेहून अधिक बळी गेले होते आणि आता काही दिवसांपूर्वी सुमारे बारा लोक बळी गेले. अनेकांच्या मुली, बहिणी, माता अशा अनेकींनी लैंगिक अत्याचार सहन केले. त्यातील काही अब्रू घालवून जिवंत तरी राहिल्या. अनेकींनी प्राण गमावले. जवळपास सव्वा वर्षानंतर मणिपूर राज्यातील ५० हजारांहून अधिक नागरिकांना सरकारी छावण्यांत राहावे लागत आहे. मणिपुरातील मागास जाती/जमाती, त्यांच्यातील आरक्षण स्पर्धा अशा वादांत गत साली सुरू झालेल्या हिंसाचारात तेथील कुकी आणि मैतेई समाजाच्या गटांनी सरकारी शस्त्रागारे लुटली. दंगलग्रस्त भागातील दोन समाजाच्या कर्मचाऱ्यांनी परस्पर विरोधी भागांत काम करण्यास नकार दिला. हे आंदोलक इतके बिनधास्त झाले आहेत की शांतता प्रस्थापित करण्यास गेलेल्या लष्करावरही त्यांनी हल्ला केला. अन्य राज्यांत असे घडत नाही. ते अनेकदा मणिपुरात घडले. विशिष्ट समाजाच्या महिलांवर हल्ला करून त्यांची विवस्त्र धिंड काढण्याचा प्रकार घडला. केंद्रीय गृहमंत्र्यांनी दाखवण्यापूरता दौरा केला, पण त्यांच्या तेथील वास्तव्यानंतरही तेथील परिस्थितीत कोणताच बदल झाला नाही. पाकव्याप्त काश्मिरातील नागरिकांनी भारतात सामील व्हावे, असे आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह करतात. गृहमंत्री अमित शहा दुसऱ्या पक्षाच्या नेत्यांना सांगतात की काश्मिरातील कोणत्याही चौकात बिनधास्त फिरा. केंद्र सरकारला काश्मीर महत्वाचे वाटते ते सवंग प्रसिद्धीसाठी. परंतु मणिपूरातील चिघळलेल्या वातावरणाविषयी केंद्र सरकार मूग गिळून बसले आहे, असेच दिसते. काही दिवसांपूर्वी एका अमेरिकन संस्थेने मणीपुरामधील हिंसाचारावर अहवाल दिला होता. केंद्र सरकारने हा अहवाल चक्क अमान्य केला. भारताची बदनामी असे लेबल लावून केंद्र सरकार मणिपुरातील अमानवीय हिंसाचाराबाबत डोळे मिटून स्वस्थ पडले आहे, हा प्रकार निर्दयी आहे असेच वाटते.



■ मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन तर्फे मॉरिशस मधील ग्लेन पार्क विघ्नेश्वर मंदिर येथे गणेश चतुर्थी राष्ट्रीय सोहळा-२०२४ चे भव्य असे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार, दैनिक 'महाराष्ट्र जनमुद्रा'चे संपादक डॉ. दीपक दळवी संपादित मराठी - इंग्रजी आरती संग्रहाचे प्रकाशन मॉरिशसचे पंतप्रधान प्रविण्दकुमार जुगनॉथ यांच्या हस्ते करण्यात आले. छायाचित्रात डावीकडून वाक्कास-फिनिक्स पालिकेचे महापौर रॉय माईक मॅन्फ्रेड मुंगूर, ग्लेन पार्क विघ्नेश्वर मंदिराचे अध्यक्ष प्रीयेशराव बापू, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे अध्यक्षअसांत गोविंद (सीएसके), मॉरिशस चे पंतप्रधान प्रविण्दकुमार जुगनॉथ, मॉरिशसचे वाहतूक आणि रेल मंत्री अँलन गनू (जीसीएसके), खासदार अँशले इट्टू, मॉरिशस मराठी सांस्कृतिक केंद्राचे अध्यक्ष अर्जुन पुतळाजी, मराठी स्पिकिंग युनियनचे अध्यक्ष नितीन बापू उपस्थित होते.

# ठाणेकरांचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पनेला प्रतिसाद



### फिरती आणि टाकी विसर्जन व्यवस्था...

नौपाडा-कोपरी, माजिवडा-मानपाडा, वागळे आणि वतर्कनगर या चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये फिरती विसर्जन व्यवस्था करून देण्यात आली आहे. सकाळी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध करून देण्यात येते. त्यावरील टाकीमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येते. यामध्ये ९९ गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले. गेल्यावर्षीपासून महापालिकेने कृत्रिम तलावांच्या सोबतीने छोट्या टाक्यांचीही व्यवस्था विसर्जनासाठी केली होती. त्यानुसार, गेल्यावर्षी ४२ ठिकाणी टाक्यांची सुविधा उपलब्ध होती. ती संख्या यंदा ४९ एवढी करण्यात आली आहे. त्यात ३ हजार ३५१ गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात आले.

ठाणे : ठाणे शहरातील तलावांमध्ये गणेशमुर्ती विसर्जनामुळे प्रदुषण होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाकडून कृत्रिम तलावांची निर्मीती केली होती. या तलावांसह विशेष टाकी आणि फिरत्या विसर्जन व्यवस्थेंतर्गत गणेशमुर्तीचे विसर्जन करत ठाणेकरांनी पालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पनेला प्रतिसाद दिल्याचे चित्र दिसून आले. याशिवाय, विसर्जनस्थळांवरून २५ टन निर्माल्य संकलित झाले असून या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे. ठाणे शहराला तलवांचे शहर म्हणून ओळखले जाते. शहरात एकेकाळी ६० हून अधिक तलाव होते. परंतु अतिक्रमणामुळे अनेक तलाव नामशेष पावले असून सद्यस्थितीत ३६ तलाव शिल्लक राहिले आहेत. यामुळे तलावांचे शहर ही ओळख टिकविण्यासाठी पालिका प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शहरातील तलावांमध्ये गणेशमुर्ती विसर्जनामुळे प्रदूषण होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पना राबविण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या या संकल्पनेत शहरांमध्ये गणेशमुर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची करत असून यंदाही पालिकेने शहरात कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे.

ठाणे महापालिकेने तयार केलेल्या विसर्जन व्यवस्थेला ठाणेकराकंडून प्रतिसाद मिळू लागला आहे. यंदा ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ३९ हजार ७५५ गणेशमुर्तीचे विसर्जन झाले आहे. त्यापैकी २० हजार ३८ गणेश मुर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन झाले आहे. याशिवाय, विशेष टाकी उपक्रमांतर्गत ३ हजार ३५१ तर, ९९ गणेशमुर्तीचे विसर्जन झाले आहे. यामुळे यंदाही ठाणेकरांनी दिड, पाच आणि गौरी-गणपतीचे कृत्रिम तलावात विसर्जन करून पालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पेला प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. दीड दिवसाच्या गणेश मूर्ती विसर्जनावेळी सुमारे १२ टन निर्माल्य संकलन झाले होते. तर, सहा दिवसाच्या गणेश मूर्ती व गौरी मूर्ती विसर्जनादरम्यान सुमारे १३ टन निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे.

ठाणे महापालिकेने एकूण १० ठिकाणी गणेश मूर्ती स्वीकार केंद्र उभारली आहेत. जेल तलाव, मढवी हाऊस-राममारुती रोड, महागिरी कोळीवाडा, टेंभी नाका, रिजन्सी हाईट्स-आझादनगर, लोढा लक्झेरिया, कामगार हॉस्पिटल, किसन नगर बस स्टॉप, मॉडेला चेक नाका, देवदया नगर-शिवाई नगर या १० ठिकाणी मूर्ती स्वीकृती केंद्रे आहेत. प्राप्त झालेल्या २५९ गणेश मूर्ती महापालिकेने कृत्रिम तलावांमध्ये विधिवत विसर्जन केले.

### कृत्रिम तलावांची व्यवस्था

आंबेघोसाळे, मासुंदा दत्त घाट, खारीगाव, घोलाई नगर, दातिवली तलाव, खिडकाळी तलाव, न्यू शिवाजी नगर कळवा तलाव, निळकंठ वूड्स- टिकूजीनी वाडी, रेवाळे, बोरिवडे, ब्रम्हांड ऋतू पार्क, हिरानंदानी रायलादेवी-१, रायलादेवी-२, उपवन तलाव परिसर-वर्तकनगर, देवदयानगर अशा १५ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

### विसर्जनाची आकडेवारी

विर्सजन स्थळ (संख्या) - मूर्तींची संख्या
कृत्रिम तलाव (१५) - ८७००
खाडी विसर्जन घाट (९) - १४,५३१
विशेष टाकी व्यवस्था (४९) - ३३५१
फिरती विसर्जन व्यवस्था (०६) - ९९
मूर्ती स्वीकृती केंद्र (१०) - २५९
एकूण - ३९,७५५

# गणेश-विसर्जन मिरवणुकीत सळसळती तरुणाई साकारणार 'ब्रो ठाणे बदलतंय!'

**ठाणे : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांना अभिप्रेत असणारे तसेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'ठाणे बदलतंय' या विषयावर स्वातंत्र्यवीर सावरकरनगरातील सार्वजनिक उत्सव मंडळाने यंदा ५४ व्या वर्षी गणेशोत्सवानिमित्त अतिशय आगळावेगळा देखावा साकारला आहे. शिवसेना गटनेते व मा. नगरसेवक दिलीप बारटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या देखाव्याला ठाणेकर गणेशभक्तांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

मंगळवारी १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला निघणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाईशी निगडित विषयांवर विविध समूह आपली कला सादर करतील. यावेळी ठाणेकरांना 'ब्रो ठाणे बदलतंय' चलचित्र देखाव्याचा आनंद घेता येईल.




मंगळवारी सायंकाळी ५ वा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास वंदन करून श्री विश्वेश्वर मंदिरातून विसर्जन मिरवणूक सुरू होईल. धर्मवीर आनंद दिघे मार्ग, शिवसेना शाखा, स्वा. सावरकर नगर येथून प्रस्थान होऊन वर्तकनगरपर्यंत ही मिरवणूक निघेल.

विविध वेशभूषांनी नटलेली तरुणाई हे या मिरवणुकीचे खास आकर्षण असेल. शिवाय ठाण्यातील १२ तरुण जलतरणपटू यात सहभागी होतील, त्यांनी श्रीलंकेच्या तलाईमन्नार भारतातील रामेश्वरमचे धनुष्कोडी हे सागरी २३ किलोमीटर

### सार्वजनिक उत्सव मंडळाचा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम

अंतर पार करण्याचा आंतरराष्ट्रीय विक्रम केला होता. शिवाय नवी दिल्लीत प्रजासत्ताकदिनी कर्तव्यपथावर झालेल्या वंदे भारत संचलनामध्ये ठाण्यातील मुद्रा आर्ट अकादमीच्या भरतनाट्यम आणि लोकनृत्याच्या ११ मुलींना नृत्य सादर करण्याचा बहुमान मिळाला, त्या नृत्यांगना याही सहभागी होतील.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर जिम्नॅस्टीकमध्ये ठसा उमटवणारे ठाणेकर खेळाडू, आरोग्यासाठी संगीताच्या तालावर विशिष्ट व्यायामप्रकार म्हणजे रोबिक्सचे प्रात्यक्षिक सादर करणारे क्रीडापटू, ठाणे ते गोवा स्केटिंग करणारे आंतरराष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक राहुल पंदिरकर यावेळी उपस्थित राहतील.

या मिरवणूक प्रतिनिधीक स्वरूपात पोलिस, नाविक दल, पदवीधर तरुण, परंपरा-संस्कृती-कला आणि आधुनिकता यांची सांगड घालणारी तरुणाई, डॉक्टर, परिचारिका, नृत्यांगना, वकील : क्रिकेटपटू, सैनिक, विकासक, मतदार, हवाईसुंदरी कथ्थक नर्तिका, वाचक... आदी समूह सहभाग घेतील. या आगळ्यावेगळ्या अशा 'ब्रो ठाणे बदलतंय' विसर्जन मिरवणुकीत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन दिलीप चंद्रकांत बारटक्के यांनी केले आहे.

# अनंत चतुर्थीच्या गणेश विसर्जनासाठी ठाण्यात वाहतुकीत बदल

ठाणे - ठाण्यात मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. अनंत चतुर्थीला ठाणे शहरात सार्वजनिक आणि खाजगी गणेशाचे विसर्जन करण्यात येते. गणेश विसर्जनाच्या वेळी सार्वजनिक मंडळ ढोल-ताशे, डीजे च्या तालावर नाचत गाजत मिरवणूक काढीत आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देतात. त्यामुळे शहरातील वाहतूक बाधित होते. ठाणेकरांना याचा त्रास होऊ नये म्हणून ठाणे शहर वाहतूक विभागाच्या वतीने शहरातील वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आलेले आहेत. ठाणे शहरातील गणेशाचे विसर्जन हे साकेत, कळवा खाडी, आदी ठिकाणी करण्यात येणारे विसर्जनाच्या मिरवणूक या शहरातून जात असल्याने वाहतूक सुरळीत राहावी म्हणून वाहतुकीतील बदल कार्नाय्त आलेले आहेत. सदरचे वाहतूक बदल हे मंगळवार(ता-१७ सप्टें) रोजी दुपारी २ वाजल्यापासून रात्री गणेशाचे विसर्जन होईपर्यंत अमलात राहणार असल्याचे वाहतूक अधिसूचनेत नमूद कार्नाय्त आलेले आहे.

■ **क्रिकनाका येथे वाहनं प्रवेश बंद** , - पर्यायी मार्ग म्हणून वाहने क्रिकनाका येथून कोर्टनाका , जांभळीनाका, स्टेशन रोड मार्गे इच्छितस्थळी जातील

■ **ठाणे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांना डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात प्रवेश बंद** - पर्यायी मार्गावरून वाहने चौकातून डावीकडे वळण घेत जांभळीनाका, स्टेशन रोड, एवन फर्निचर मार्गे इच्छितस्थळी जातील.

■ **चराई सिव्हिल टेभीनाक्याकडे जाणाऱ्या वाहनांना ठामपा शाळेजवळ प्रवेश बंद** - पर्यायी मार्ग वाहने कोर्टनाका सर्कल येथून उजवीकडे वळूनडॉ बाबासाहेब आंबेडकर चौक डावीकडे वळण घेत जांभळीनाका, स्टेशन रोड, एवन फर्निचर मार्गे इच्छितस्थळी जातील.

■ **ठाणे स्टेशनकडून टॉवर नाक्याकडे जाणाऱ्या वाहनांना टॉवरनका येथे प्रवेश बंद** - ✻ पर्यायी मार्ग ठाणे स्टेशन कडून सॅटीस ब्रिजवरून येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस.टी, ती.एम.टी बसेस बी केबीन सॅटीस ब्रिजवरून गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील, तर रिक्षा, चारचाकी, लहान वाहने सॅटीस ब्रिजखालून मुसा चौक येथून सरळ टॉवर नाका, टेभीनाका मार्गे इच्छितस्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना नियम यातून पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, गणेशमूर्ती विसर्जनाची वाहने व इतर आवश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नसल्याचे अधिसूचनेत नमूद केले आहे.

## कोपर रेल्वे स्थानकाजवळील बेकायदा गाळ्यांना नोटिसा

**(पान १ वरून)** अशाप्रकारे पालिका, रेल्वेच्या जागा हडप करून भूमाफिया या गाळ्यांमध्ये कार्यालये सुरू करतात. तेथून चाळ, इमारती मधील बेकायदा घरे, गाळ्यांची विक्री करतात, अशा तक्रारी आहेत. भूमाफियांनी आपले म्हणणे वेळेत सादर केले नाहीतर तातडीने हे बेकायदा गाळे पालिकेने जमीनदोस्त करावेत, अशी स्थानिकांची मागणी आहे.

## विधानसभेच्या निवडणुकीआधी महामंडळांचं वाटप, ३ नेत्यांना मंत्रीपदाचा दर्जा

**(पान १ वरून)** शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांच्यावर राज्य सरकारने मोठी जबाबदारी दिली आहे. संजय शिरसाट गेल्या अडीच वर्षांपासून मंत्रिपदाच्या प्रतिक्षेत होते. अखेर विधानसभा निवडणुकीच्याआधी त्यांच्यावर राज्य सरकारने मोठी जबाबदारी दिली आहे. संजय शिरसाट यांची शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाच्या अर्थात सिडकोच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर लोकसभा निवडणुकीत तिकीट नाकारण्यात आलेले नांदेडचे माजी खासदार हेमंत पाटील यांनादेखील महामंडळाची जबाबदारी देण्यात आली आहे. हेमंत पाटील यांची बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर माजी खासदार आनंदराव अडसूळ यांची राज्याच्या अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## ४८ तास दारूबंदी! राज्य सरकारने घेतला मोठा निर्णय

**(पान १ वरून)** व्हायरल ऑडिओला विरोध केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. ही बंदी तात्काळ लागू झाली आहे आणि पुढील ४८ तास लागू राहील. परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. बंदी लागू झाल्यानंतर बंटवाल नगरपरिषदेच्या हद्दीतील दारूची दुकाने आणि बार बंद राहणार आहेत.



▲ भाजपा माजी नगरसेवक डॉ. राजेश मढवी व सौ. प्रतिभा राजेश मढवी यांनी अभिजित कोल्हे यांच्या घरातील गणरायचे दर्शन घेतले.





■ गणेशोत्सव २०२४ : किसन नगर येथील जनजागृती मित्र मंडळ येथे प्रकाश शिंदे सहपरिवार महाआरती करताना छायाचित्रात दिसत आहेत.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे.
३ रा ते ६ वा मजला
वेस्ट व्ह्यू बिल्डींग, राम मारुती रोड,
ठाणे (प) - ४००६०१

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांकः ध उ आ / ११९९/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांकः **देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण संघ**
**नोंदणी क्र. एफ/ २४६ /ठाणे**
**अर्जदार: श्री. जगन्नाथ कृष्णाजी जोशी**

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या बदल अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

Following Property is to be registered on records.

**SCHEDULE OF PROPERTY**

Office No 101, admeasuring about 295 Square feet (Equivalent to 27.41 Sq. Mtrs.) built up area on First Floor, in the building called "DEV SHANKAR" Co-Operative Housing Society Ltd, Situated at Aacharya Tulsi Marg, Tai Pingle Chowk, near Sarvesh Hall, Dombivli (East) Tal. Kalyan, Dist. - Thane

**SCHEDULE OF PROPERTY**

Survey No 34/A1, Hissa No 14 (Pt), bearing corresponding CTS Nos 7559 to 7563 Revenue Village Gajbandhan Patharli, Dombivli (East) Taluka Kalyan, Dist. - Thane and within limits of Kalyan Dombivli, Municipal Corporation Registration Sub - District Kalyan, Registration District Thane.

Bounded as follows:
On East Side: Flat / Office no 102
On the West Side: Property of Mr. Nerurkar
On the North side: Krishnanjali Building
On the South side : Flat / Office no 104
Value of the Property: Rs. 16,51,000/- (Rupees Sixteen Nine Lakh Fifty One Thousand only)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यायची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६/०९/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे.
३ रा ते ६ वा मजला
वेस्ट व्ह्यू बिल्डींग, राम मारुती रोड,
ठाणे (प) - ४००६०१

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांकः ध उ आ / १२००/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांकः **देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण संघ**
**नोंदणी क्र. एफ/ २४६ /ठाणे**
**अर्जदार: श्री. जगन्नाथ कृष्णाजी जोशी**

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या बदल अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

Following Property is to be registered on records.

**SCHEDULE OF PROPERTY**

Office No 104, admeasuring about 600 Square feet (Equivalent to 55.76 Sq. Mtrs.) built up area on First Floor, in the building called "DEV SHANKAR" Co-Operative Housing Society Ltd, Situated at Aacharya Tulsi Marg, Tai Pingle Chowk, near Sarvesh Hall, Dombivli (East) Tal. Kalyan, Dist. - Thane

**SCHEDULE OF PROPERTY**

Survey No 34/A1, Hissa No 14 (Pt), bearing corresponding CTS Nos 7559 to 7563 Revenue Village Gajbandhan Patharli, Dombivli (East) Taluka Kalyan, Dist. - Thane and within limits of Kalyan Dombivli, Municipal Corporation & Registration Sub - District Kalyan, Registration District Thane.

Bounded as follows:
On East Side: Property of Bhagatsingh
On the West Side: Property of Mr. Nerurkar
On the North side: Flat / Office No. 101
On the South side : Property of Mr. Gaikwad
Value of the Property: Rs. 18,00,000/- (Rupees Eighteen Lakh only)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यायची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उपायुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६/०९/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे

## भारतीय रेल्वे

■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)

■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

सभासद व्हा ....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

## एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

■ पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
■ अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
■ शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्त्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
■ परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकर

■ पद क्र. असिस्टंट डायरेक्टर, असिस्टंट हायड्रोग्राफिक सर्व्हेअर, परवाना इंजिन ड्रायव्हर, ज्युनियर अकाउंट्स ऑफिसर, ड्रेज कंट्रोल ऑपरेटर, स्टोअर कीपर, मास्टर 2nd क्लास, स्टाफ कार ड्रायव्हर, मास्टर ३ीव क्लास, मल्टी टास्किंग स्टाफ टेक्निकल असिस्टंट (
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil / Mechanical)
पद क्र.२: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) इंजिन ड्रायव्हर परवाना
पद क्र.४: B.Com + ०३ वर्षे अनुभव किंवा B.Com+Inter ICW-/Inter C-.
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण +१० वर्षांसह अनुभवसह प्रथम श्रेणी चालक म्हणून योग्यतेचे प्रमाणपत्र किंवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा +०१ वर्षे अनुभव (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) मास्टर २पव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) वाहन चालक परवाना (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) मास्टर ३ीव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: पदवी (Civil / Mechanical/ Marine Engineering /Naval Architecture) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil / Mechanical / Marine Engineering / Naval Architecture)+ ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: १५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१, २, ७: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.३, ४, ५, ८, ९ ११: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.६: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: १८ ते २५ वर्षे
■ Fee: General/OBC: 500/- SC/ST/EWS/PWD:200/-
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ सप्टेंबर २०२४

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

■ पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-IV ३५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
■ फी : ५९/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
■ https://konkanrailway.com/

# विश्वगुरु- पंतप्रधान नरेंद्रजी मोदी



सशक्त भारताचे कणखर नेतृत्व
**पंतप्रधान नरेंद्रजी मोदी**
यांन वाढदिवसाच्या
**हार्दिक शुभेच्छा!**

**जगात आतापर्यंत अनेक राष्ट्रप्रमुख होऊन गेलेत.प्रत्येकाची कार्यपद्धती वेगवेगळी होती.परंतु वैश्विक स्तरावर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे सर्वाधिक लोकप्रिय ठरलेले राष्ट्रप्रमुख आहेत.शून्यातून विश्व निर्माण करण्याची किमया त्यांनी स्वतःच्या बळावर करून दाखविली आहे.त्यामुळेच ते गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून अन् नंतर देशाचे पंतप्रधान म्हणून यशस्वी ठरले आहेत.उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आज ते विश्वगुरू म्हणून साऱ्या जगतात किर्तीमान झाले,याचा आम्हा भारतीयांना सार्थ अभिमान आहे. लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदीसाहेब यांना मराठी जनमानसाकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.....आई जगदंबे मोदीजींना आरोग्यदायी असं दीर्घायुष्य देवो,ही तिच्या चरणी प्रार्थना!**

नरेंद्रजी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी दामोदरदास मोदी यांच्या घराण्यात हिराबेन यांच्या उदरी झाला,अन् जणू भारताचा भाग्यविधाता उदयास आला.मोदीजींचे मुळगाव गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील वडनगर हे आहे.त्यांच्या भावांचे नाव प्रल्हादजी मोदी अन् अमरितजी मोदी.कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना लहानपणापासूनच काबाडकष्ट करण्याची सवय जडली होती.शालेय जीवनापासून नरेंद्रजींना आत्मनिर्भर होण्याचा निर्धार असल्याने त्यांनी कोणापुढे हात पसरले नाहीत.शालेय शिक्षण घेत असताना त्यांनी आपला शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी रेल्वे स्टेशनवर विनासंकोच चहावाला म्हणून काम केले.ह्या कामामुळे त्यांना कधी कमीपणा वाटला नाही.काम लहान असो वा मोठे ते आपापल्या परीने श्रेष्ठ असते,हा सूचक संदेश त्यांनी सर्वधर्मीय लोकांना दिला.वडील दामोदरदास मोदी अन् आई हीराबेन मोदी यांनी दिलेल्या आदर्श
जीवनाच्या शिकवणीची शिदोरी बरोबर घेऊन ते देश सेवेसाठी घरातून बाहेर पडले.त्यांनी गुजरात विद्यापीठातून एम.ए.(राज्यशास्त्र)ही पदवी संपादन केली.त्यानंतर त्यांनी आपले जीवन आर.एस.एस आणि भारतीय जनता पक्षाच्या वाढीसाठी समर्पित केलं आहे.

मोदीजींचे पक्ष बांधणीतले अन् पक्ष वाढीतले चातुर्य तसेच नेतृत्वगुण पाहून केंद्रीय पक्ष संघटनेने त्यांना गुजरात विधानसभेची जबाबदारी सोपविली. स्वतः नरेंद्रजींने २००२,२००७ व २०१२ अशी सलग तीन वेळा विधानसभा निवडणुक मोठ्या मताधिक्याने जिंकली.त्यानंतर त्यांची गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी वर्णी लागली.७ ऑक्टोबर २००५ ते २२ मे २०१४ पर्यंत ते मुख्यमंत्री पदावर विराजमान राहिले.दरम्यान गुजरात राज्यात भयंकर मोठा भूकंप झाल्याने जीवित व वित्तीय हानी मोठ्या प्रमाणात झाली.अशा आपत्कालिन परिस्थितीत मोदीजींनी ठोस उपाययोजना करून पूर्वपदावर स्थिती आणली.त्यामुळे तेथील लोकांचा त्यांच्यावर दांडगा विश्वास बसल्याने गुजरातमध्ये बीजेपीची घोडदौड आजही सुरूच आहे.त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत गुजरातची कृषी,जलसिंचन,उद्योग, ऊर्जा निर्मिती क्षेत्रात उत्तुंग झेप घेतली.विकासाच्या बाबतीत गुजरात हे देशात रोल मॉडेल ठरले आहे.उल्लेखनीय गोष्ट म्हणजे गुजरात हे ग्लोबल ब्रँड बनले असून तेथे अनेक देशांनी विविध प्रकल्प उभारणीत मोठी गुंतवणूक केली आहे.मोदींच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचा हाच खरा करिश्मा आहे.नर्मदा प्रोजेक्ट मुळे तर,शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटून पाणी टंचाईवर पूर्णतः मात केली आहे.गुजरातमधील चरंका हा आशिया खंडातील सर्वात मोठा सोलर पार्क म्हणून प्रख्यात आहे.वास्तवात मोदींच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत गुजरात राज्य हे सुजलाम सुफलाम झालं आहे.

सुदैवाची गोष्ट म्हणजे मोदीजींच्या नेतृत्वाखाली बीजेपीने २०१४ साली लोकसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत २८० जागा जिंकून एकहाती सत्ता ग्रहण केली.नरेंद्रजी स्वतः वाराणसी लोकसभा सीटवर मोठ्या मताधिक्याने विजयी झाले.मुख्यमंत्री असताना जितक्या गतीने गुजरातचा सर्वांगीण विकास केला,तेवढ्याच वेगाने पंतप्रधान झाल्यावर मोदी हे देशाचा सर्वच क्षेत्रांचा विकास करत आहेत.नरेंद्रजी मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने २०१४ प्रमाणेच २०१९ मध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत देखील मोठे यश मिळविले.मोदींनी पंतप्रधान झाल्यावर सर्वप्रथम खेडी व शहरे यातील असमतोल मिटविण्यावर भर दिला.ग्राम विकासाला सर्वोच्च प्राधान्य देऊन तेथील रस्ते,जल सिंचन,वीज,माहिती तंत्रज्ञान या मूलभूत सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे दळण वळण ची उत्तम सोय होऊन खेडी ही शहरांना जोडली गेली.महात्मा गांधी यांच्या खेड्याकडे चला या संदेशाला अनुसरून आत्मनिर्भर ग्राम व्यवस्था उभारण्यावर अधिक भर दिला.त्यामुळे विकासाची फळे खेड्यांना देखील चाखायला मिळू लागली.त्यामुळे मोदीजी हे ग्रामस्थांचे मसिहा म्हटले गेले.दारिद्र्य रेषेखालील गोरगरीब लोकांचा आर्थिक विकास व्हावा,यादृष्टीने मोदी सरकारने आपले आर्थिक धोरण आखले.एस.टी.आणि एस.सी.साठी असलेला ट्रोसिटी क्ट अधिक मजबूत केला.मागासवर्गीयांसाठी असलेला राष्ट्रीय आयोगाला घटनात्मक दर्जा दिला.सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्त्यासह स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याकरिता अर्थसहाय्य देणं गरजेचं आहे,हे जाणून त्यासाठी स्थायी कायदे केले.त्यातून सामाजिक सबलीकरण होण्यास चालना मिळत आहे. मोदीजींनी सन २०१९ मधील पहिल्याच कॅबिनेटमध्ये ब्लॅक मनी शोधून काढण्यासाठी एसआयटीची नेमणूक केली.पाकिस्तान,नेपाळ, बांगला देश या देशांमध्ये भारतीय करन्सीच्या नकली नोटा मोठ्या प्रमाणात छापून आर्थिक व्यवहारात आणल्या जात होत्या.त्यावर ठोस उपाय म्हणून विमुद्रीकरण करण्याचा तातडीने निर्णय घेऊन एक हजार आणि पाचशेच्या नोटा भारतीय चलनातून कायमच्या बाद केल्या.बेनामी मालमत्ता संबंधी कायदा करून डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर(डीबीटी)ची कायदेशीर तरतूद केली.मोदी सरकारने काळा पैसा शोधून काढण्यासाठी प्रभावी मोहीम राबविली,त्यामुळे भारतीय मतदारांचा मोदी प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला.सर्वात महत्वाचे म्हणजे एन.डी.ए. सरकारच्या काळात देशात इन्कम टॅक्स भरणाऱ्यांची संख्या दुप्पट होऊन,सर्वच क्षेत्रातील नागरिक प्रामाणिकपणे टॅक्सेस भरू लागणे,ही भारतीयांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे.खरं तर,हेच मोदींच्या बहुआयामी नेतृत्वाच्या यशाचं गमक आहे.

मा.मोदीसाहेब अन् केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांच्या अथक प्रयत्नांतून ट्रीपल तलाक ची जुनी पद्धत बंद करण्यात आली.यातून एन डी ए सरकारने मुस्लिम महिलांना न्याय मिळवून दिला.यासाठी कृतज्ञतेच्या भावनेतून मुस्लिम महिलांनी मोदीजींचे मनस्वी आभार मानले.जम्मू कश्मीर राज्याला गेल्या ७० वर्षांपासून असलेले स्पेशल स्टेटस बदलण्याच्या दृष्टिकोनातून मोदी सरकारने कलम ३७० रद्द केले.त्यामुळे अन्य राज्यातील उद्योजकांना जम्मू कश्मीरमध्ये व्यापार-उद्योग करण्यास मुभा मिळाली. सदर ऐतिहासिक निर्णयामुळे या राज्याचा आर्थिक विकास होण्यास गती मिळत आहे.तसेच येथील बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

स्वच्छ भारत अभियान अन् स्मार्ट सिटी योजना मोदी सरकारने प्राधान्याने राबविल्याने स्वच्छ व सुंदर भारत उभारण्याचे मोदीजींचे स्वप्न खऱ्या अर्थानं साकार होऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना ही खरी मानवंदना ठरली आहे.महत्वाचे म्हणजे यातून सर्वधर्मीय लोकांना स्वच्छ व सुंदर जीवन जगण्याची सवय लागली.खरं तर,हीच या अभियानाची फलश्रुती होय.विकसित भारत चे स्वप्न साकार करण्यासाठी मोदी सरकार हे तरुणांकरिता रोजगार निर्मिती कार्यक्रम तर,महिलांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवित असून,त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे.सुशिक्षित बेरोजगारांनी नोकरीवर अवलंबून न रहाता,त्यांनी व्यवसायाकडे वळावे या उद्देशाने मुद्रा कर्जाची मर्यादा वाढवून २० लाख रुपये केल्याचे यंदाच्या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

मोदीजींच्या प्रयत्नातून वन रँक वन पेन्शन स्कीम लागू झाली.सदर स्कीम गेल्या २० वर्षांपासून पेंडींग पडली होती.भारतीय सैनिकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळून त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.मोदीजींना भारतीय सैनिकांबद्दल मोठा अभिमान व आदर असल्याने ते दरवर्षी मोठ्या आनंदाने सैनिकांबरोबर दिवाळी साजरी करत असतात. मोदीजींनी सुरक्षिततेच्या दृष्टीने सशस्त्रांच्या आधुनिकरणावर अधिक भर दिला. बुलेटप्रुफ जॅकेटची सैनिकांची मागणी मोदीजींनी मान्य करून त्यांना ते उपलब्ध करून दिले.अनेक वर्षापासून ही मागणी प्रलंबित पडलेली होती. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वातंत्र्याला ७५ वर्षे लोटूनही,ज्या सैनिकांनी आणि पोलिसांनी कर्तव्य बजावत असताना आपल्या देशासाठी प्राण गमावले,त्यांचे राष्ट्रीय स्मृती स्मारक उभारले गेले नाहीत.ही गोष्ट पंतप्रधान अन् संरक्षण मंत्र्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी ही स्मारके उभारण्यास तात्काळ मान्यता दिली.वास्तवात हाच खरा सैनिकांप्रती आदर-सन्मान आहे,हे मोदींनी गतकाळातील राज्यकर्त्यांच्या निदर्शनास आणून दिले.

कोरोना महामारीच्या काळात सारं जग हादरून गेलं होतं.जगातील महासत्तांसह अन्य लहान-मोठे देशातील लाखो लोक या महामारीला बळी पडले.प्रारंभी भारतातही हजारों लोकांचे या महामारीमुळे जीव गेलेत.या आपत्कालीन परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी मोठ्या धैर्याने अन् संयमाने कोरोनाशी लढा देण्यासाठी भारतीयांना आवाहन केले.त्यांचे मनोबल वाढविले.नागरिकांसाठी एक रीतसर नियमावली तयार करून दिली.भारतीयांनी मोदीजींच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद देऊन कोरोनाला नियंत्रित करण्यास मोठा हातभार लावला.दुसऱ्या देशांवर विसंबून न रहाता, मोदीजींच्या आदेशानुसार कोव्हिशिल्ड/कोव्हासिन ह्या दोन स्वदेशी लसी संशोधित केल्या गेल्या.अन् प्रत्येक राज्याच्या मागणीनुसार कोरोना लसीचे वितरण करण्यात आले.त्यामुळे देशातील निम्म्याहून अधिक लोकांना लस घेणे सुकर झाले.जगातील इतर देशांच्या तुलनेत भारताने कोरोना नियंत्रित करण्यात मोठे यश मिळविले.एक पाऊल पुढे टाकत मोदीजींनी उदार मनाने अनेक कोरोनाग्रस्त देशांना मागणी करताच भारतीय बनावटीच्या लसी निर्यात केल्या.परिणामी येथील लोकांचेही जीव वाचलेत.याबद्दल नरेंद्रजी मोदी यांच्या मानवतावादी धोरणाला भारतीयांसह जगातील नागरिकांनी हॅट्स ऑफ केलं आहे.आज विश्वातील प्रत्येक लहान -मोठा देश अन् त्यांचे राष्ट्र प्रमुख हे महत्वपूर्ण विषयांवर मोदीसाहेबांचे मार्गदर्शन घेत असतात,त्यांचे ओपिनियन घेत असतात.उदा.रशिया- युक्रेन युद्ध.एवढा मोठा मान-सन्मान,आदर जगातील राष्ट्रप्रमुख मोदीसाहेबांचा करताहेत.मोदीजींच्या राजकीय आणि प्रशासकीय कौशल्यामुळे आज भारताने फ्रान्सला मागे टाकत जगात ५ वें स्थान पटकावले आहे. या पार्श्वभूमीवरच मोदीसाहेबांना जागतिक स्तरावर विश्वगुरू म्हटले जाते.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शिफारशीने महाराष्ट्राला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात विविध प्रकल्पांना भरीव निधी दिली आहे.विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प - ६०० कोटी; महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार - ४०० कोटी; पुणे मेट्रो -८१४ कोटी; नागपूर मेट्रो - ६८३ कोटी; मुळा-मुठा नदी संवर्धन - ६९० कोटी; नाग नदी पुनरुज्जीवन - ५०० कोटी; मुंबई मेट्रो - १ हजार ८७ कोटी; एम यु टी पी -३ - ९०८ कोटी ; दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर - ४९९ कोटी; महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प - १५० कोटी; सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉर -४६६ कोटी; पर्यावरणपूरक शाश्वत कृषी प्रकल्प - ५९८ कोटी.इतकेच नव्हे तर,मोदीसाहेबांनी राज्यातील महामार्ग,सागरी मार्ग प्रकल्प,रेल्वे प्रकल्प, नवे एअरपोर्ट उभारणी यांना मुबलक निधी प्रदान केली आहे.याबद्दल कृतज्ञतेच्या भावनेतून मुख्यमंत्र्यांनी मोदीसाहेबांचे आभार व्यक्त केले आहे.

नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली एन डी ए गठबंधनने २०२४ मधील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जिंकून तिसऱ्यांदा केंद्राची सत्ता मिळविली आहे.यासाठी त्यांचे मनस्वी अभिनंदन अन् पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा!पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या आशिर्वादाने महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,(बाळासाहेबांची शिवसेना) उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस(भारतीय जनता पार्टी)व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार (राष्ट्रवादी)यांचे महायुती सरकार स्थापन झाले आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या पावलावर पाऊल टाकत,राज्यातील महायुती सरकार हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनसामान्यांच्या, महिलांच्या अन् शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध कल्याणाकारी योजना राबवित आहे.

वास्तविक पहाता,पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे गोरगरीब,निर्धन लोकांसाठी मसिहा ठरले आहेत.स्वातंत्र्य मिळाल्यापासून हजारों खेडी विजेपासून वंचित होती.अशा १८००० खेड्यांना मोदी सरकारने वीज उपलब्ध करून दिली.त्यामुळे मोदीजी हे ग्रामस्थांसाठी वरदान साबित झाले आहेत.याशिवाय सात कोटी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत कुकिंग गॅस मोफत उपलब्ध करून दिला.प्रधानमंत्री जन धन योजनेखाली सुमारे ३५ कोटी गोरगरीब लोकांची
राष्ट्रीयकृत बँकेत खाती उघडून दिली.या दयावान व लोकाभिमुख मोदी सरकारने आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना प्रती वर्ष ५ लाखाची मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली आहे.याशिवाय जननी सुरक्षा योजना,अटल पेन्शन योजना,प्रधानमंत्री पीक विमा योजना,प्रधानमंत्री आवास योजना,प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना,सुकन्या समृद्धी योजना,दीनदयाल अंत्योदय योजना,पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना,प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना,प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना,दीनदयाल अपंग पुनर्वसन योजना आदी अनेक लोकोपयोगी योजना मोदी सरकारने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू केल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे भारताचे नाव साऱ्या जगतात किर्तीमान करणारे खऱ्या अर्थानं विश्वगुरू ठरले आहेत.यास्तव त्यांना मराठा जनमानसाचा मानाचा मुजरा!
जय...हिंद! जय....महाराष्ट्र!

**लेखक-रणवीर राजपूत,ठाणे**
**गवर्नमेंट मिडिया(अधिस्वीकृती धारक),महाराष्ट्र शासन**

# ठाणे महापालिकेतर्फे घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धेत जय भवानी मित्र मंडळ पहिल्या क्रमांकाचे मानकरी








ठाणे – ठाणे महापालिकेतर्फे दरवर्षीप्रमाणे घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धा २०२४चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेत आझाद नगर नंबर २ येथील जय भवानी मित्र मंडळ हे पहिल्या क्रमांकाचे मानकरी ठरले आहे. तर, सार्वजनिक उत्सव मंडळ, स्वातंत्र्यवीर सावरकर नगर यांना स्वच्छता पुरस्कारात प्रथम आणि गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास उत्कृष्ट मूर्तीकाराचा प्रथम क्रमांक मिळाला आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या आणि विजयी ठरलेल्या सर्व गणेशोत्सव मंडळांचे ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अभिनंदन केले आहे.

ठाणे महापालिकेच्यावतीने घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धेत ठाण्यातील एकूण २१ मंडळांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परीक्षण करताना मूर्ती, सजावट, विषय मांडणी, हेतुपूर्ती, शिस्त व स्वच्छता तसेच कलावंतांचे काम या सर्व घटकांचा विचार करण्यात आला. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ चित्रकार सदाशिव कुलकर्णी व किशोर नादावडेकर आणि पत्रकार पंकड रोडेकर यांनी केले.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकाविलेल्या जय भवानी मित्र मंडळाने 'निष्काळजीपणामुळे होणारी जिवितहानी' हा विषय त्यांच्या देखाव्यातून मांडला आहे. तर, द्वितीय क्रमांक महागिरी कोळीवाडा येथील एकविरा मित्रमंडळ यांना मिळाला आहे. त्यांनी 'कैफियत समाधानाची' हा विषय मांडला आहे.

तृतीय क्रमांक गांधीनगर येथील शिवसम्राट मित्रमंडळ यांच्या 'सुरक्षितता' या विषयावरील देखाव्यास मिळाला आहे.

चैतन्य मित्र मंडळ, जिजामाता नगर सोसायटी (विविध प्रकारच्या नशेचे दुष्परिणाम) यांना चौथा, सार्वजनिक उत्सव मंडळ, जय भवानी नगर (ग्लोबल वॉर्मिंग) यांना पाचवा, ओम शक्ती विनायक मित्र मंडळ, गांधीनगर (युवा भारत) यांना सहावा क्रमांक मिळाला आहे. सातवा क्रमांक शिवगर्जना मित्रमंडळ (बटणाचा देखावा) आणि आठवा क्रमांक केदारेश्वर मित्रमंडळ, आनंदनगर (काळाप्रमाणे बदललेली माणसे) यांना मिळाला आहे.



## पर्यावरणपूरक गणरायाच्या उत्सवातून आयोध्येचे दर्शन

ठाणे – ठाण्यातील प्रख्यात वास्तू विशारद संजय बोबडे यांच्या निवासस्थानी आयोध्येचे दर्शन घडविणारी पर्यावरणपूरक गणरायाची मूर्ती साकारली आहे. हिरानंदानी इस्टेट येथे वास्तव्यास असलेले संजय बोबडे यांच्या घरात शाडूच्या मातीतून फक्त दोनच रंगांचा वापर करून मूर्ती साकारली आहे. तर मूर्तीच्या सभोवती कागदापासून महिरप तयार केली आहे. या महिरपीवर आयोध्येतील रामलल्लाच्या मूर्तीप्रमाणेच आरेखन केले आहे. अतिशय सुंदर आणि सुबक पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे परिसरात कौतूक होत आहे.



ज्येष्ठ पत्रकार रणवीर राजपूत यांच्या निवासस्थानातील श्रींची मूर्ती. यावेळी उपस्थित सौ. लता राजपूत छायाचित्रात दिसत आहे. यावर्षी त्यांच्या घरी दीड दिवसाच्या गणेशोत्सव साजरा करण्यात आला.





ठाणे – काजूवाडीचा राजा गणेशोत्सव मंडळाने यंदाच्या गणेशऊसावत पेशवाई वाडा ची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. (छाया – मनोज सिंह)



कळव्याचा विघ्नहर्ता श्री साई गणेश मित्र मंडळ कळवा सार्वजनिक गणेशोत्सव यंदाचा १६ वे वर्ष यावर्षी सुद्धा पर्यावरण इको फ्रेंडली देखावा मंडळाच्या वतीने साकार करण्यात आला आहे



दै. महाराष्ट्र सम्राटचे छायाचित्रकार व पत्रकार अशोक घाग यांच्या निवासस्थानातील गणपती बाप्पा...!



गेली ६३ वर्षे अखंडपणे आयोजित करण्यात येत असलेल्या पनवेल मधील मदन कोळी व परिवार यांच्या गणेशोत्सवास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे कोळी परिवाराच्यावतीने स्वागत सत्कार करण्यात आला.

## आशियाँ फाऊंडेशनने दिला महिला सबलीकरणाचा नारा !

### शिवाजी चौक आणि नारपोलीत पथनाट्यांना जोरदार प्रतिसाद

ठाणे – आशियाँ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने भिवंडी तालुक्यात सध्या महिला अत्याचार, महिला सक्षमीकरण यावर जनजागृती अभियान सुरू केले आहे. त्या अनुषंगाने आशियाँ फाऊंडेशनने विविध गणेशोत्सव मंडळाच्या परिसरात पथनाट्य सादर करून जनजागरण अभियान राबविले.






सध्या राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. याबाबत समाजामध्ये जनजागरण व्हावे तसेच कायद्याची माहिती जनतेला मिळावी, या दृष्टिकोनातून आशियाँ फाऊंडेशनचे अध्यक्ष मोहसीन शेख आणि सरचिटणीस दिपा सावंत – खोत यांच्या नेतृत्वाखाली जनजागरण अभियान सुरू केले आहे. रविवारी या संस्थेच्या वतीने शाळा , कार्यालये, बाजार आदी सार्वजनिक ठिकाणी होणारे लैंगिक शोषण आणि मुलींना आत्मरक्षण, पालकांची भूमिका, कायदे या विषयी रितेश जाधव, साक्षी मंचेकर,राहुल जगताप, सीताराम खडे, आकाश लोणारे यांनी पथनाट्याद्वारे प्रबोधन केले. भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि नारपोली येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ येथे पथनाट्य सादर केले. या प्रसंगी बालगोपाळ मित्रमंडळ, साई प्रसन्न को. सो. नारपोलीचे अध्यक्ष श्री. घोसाळकर यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मिरेश उजगरे, वेदांत खोत, प्रशांत अदनवाले, रवींद्र शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## संविधानामुळे आजही आपले स्वातंत्र्य आणि अधिकार अबाधित –आ. प्रशांत ठाकूर

**पनवेल – न्याय, समता आणि बंधूता हे भारतीय संविधानाचे स्तंभ आहेत. देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. संविधानामुळे आजही आपले स्वातंत्र्य आणि अधिकार अबाधित आहे. याचे महत्त्व आपण ओळखले पाहिजे, असे प्रतिपादन आ. प्रशांत ठाकूर यांनी रविवारी केले.**

युवकांना कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन विविध योजना राबवित आहेत. त्यानुसार देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते राज्यातील ४२४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) संविधान मंदिराचे आभासी पद्धतीने उद्घाटन झाले. यानिमित्ताने पनवेल येथील आयटीआयमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते संविधान मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी डॉ. पराग पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधान आणि आपला अभिमान या विषयावर मार्गदर्शन केले.



## कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीतील रस्त्यांची लवकरच यांत्रिकी पध्दतीने साफसफाई, चार यांत्रिक वाहनांची खरेदी

कल्याण – कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने पालिका हद्दीतील सिमेंट काँक्रिट रस्त्यांची साफसफाई करण्यासाठी चार यांत्रिकी वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया निविदा पध्दतीने पूर्ण केली आहे. लवकरच ही वाहने पालिकेत दाखल होणार आहेत. या यांत्रिक वाहनांच्या साहाय्याने कल्याण, डोंबिवलीतील सिमेंट काँक्रिट रस्त्यांची साफसफाई केली जाणार आहे.

पालिका हद्दीतील सिमेंट काँक्रिट रस्ते यांत्रिकी वाहनाने सफाई करण्यात यावेत. यामुळे या रस्त्यांवरील सफाई कामगारांचे पालिकेचे मनुष्यबळ इतर भागात वापरात येईल, असा आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांचा प्रस्ताव होता. आयुक्तांच्या आदेशावरून पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून स्वच्छ शहर लेखाशीर्षकांतर्गत ही चार यांत्रिकी वाहने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. ऑनलाईन माध्यमातून जेम संकेतस्थळावर ही निवीदा प्रक्रिया पार पडली. स्पर्धात्मक निवीदा प्रक्रियेतून पुणे येथील मे. कॅम व्हिडा कंपनीला रस्ते सफाई कामासाठी यांत्रिकी वाहने खरेदी करण्याचा कार्यादेश देण्यात आला.

ही वाहने खरेदीची प्रक्रिया सुरू असून, लवकरच ही वाहने पालिकेत दाखल होणार आहेत, असे आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सांगितले. या वाहनांची उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदणी करून, मग ही वाहने प्रत्यक्ष साफसफाई कामासाठी रस्त्यावर उतरविण्यात येणार आहेत.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील ५४ किमी लांबीचे काँक्रिट रस्ते यांत्रिकीकरणाने सफाई करण्याचे नियोजन केले आहे. ही यांत्रिकी वाहने लवकरच पालिकेत दाखल होतील. या वाहनांमुळे सफाई करताना धूळ आणि अन्य घटक हवेत उडणार नाहीत. त्यामुळे श्वसन विकार आणि इतर आरोग्याच्या समस्या कमी होण्यास साहाय्य होईल.

– डॉ. इंदुराणी जाखड, आयुक्त

**यांत्रिकी वाहने –** रस्ता सफाई यांत्रिकी वाहन हे साडे सहा घनमीटर क्षमतेचे आहे. ते नैसर्गिक वायूवर चालणारे आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यात हे वाहन महत्वाची भूमिका बजावणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान या वाहनात आहे. या वाहनाच्या मागील बाजूस सफाईसाठी दोन दाते (ब्रश) असतील. दोन्ही चाकांच्या मध्यभागी चेसीसखाली दोन गोलाकार चक्राकार पध्दतीने फिरणारे दोन दाते (ब्रश) असणार आहेत. वाहनाच्या पाठीमागील बाजूस एक मोठी वाहिका जोडलेली आहे. ही वाहिका रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांखालील, अडगडळीच्या जागेतील कचरा प्रखर दाबाने वाहिकेच्या माध्यमातून यंत्रामध्ये खेचून घेईल. या वाहनांमुळे रस्त्यांवरील धुळीवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. या वाहनांवर एक चालक, तीन कामगार सोबत असतील. या यांत्रिकी वाहनांचा अधिकाधिक वापर रात्रीच्या वेळेत करण्याचे पालिकेचे नियोजन आहे. या स्वच्छतेच्या कामावर घनकचरा उपायुक्तांसह स्वच्छता निरीक्षक, मुकादम ही यंत्रणा देखरेखीसाठी असणार आहे. या यांत्रिकीकरणामुळे ज्या काँक्रिट रस्त्यांवर यापूर्वी सफाई कामगारांकडून सफाई केली जात होती. त्या रस्त्यांवरील कामगार इतर भागात फिरवणे पालिकेला शक्य होणार आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१